**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ.बेनेडिक्ट मार्टिन फ्रान्सिस
कमला नेहरु रुग्णालय, ३५, मंगळवार पेठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०० / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.बेनेडिक्ट मार्टिन फ्रान्सिस
कमला नेहरु रुग्णालय, ३५ मंगळवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका डॉ.प्र.शं.धायगुडे

**जन माहित्ती अधिकारी** तथा सहाय्यक आरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका प्रतिनिधी डॉ.प्र.शं.धायगुडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.५.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयातील मेडिकल सुपरिंटेंडेंट या पदाची कर्तव्ये व अधिकार याची माहिती आपण मागितली होती. डयूटी लिस्ट उपलब्ध नसल्याचे व कामाच्या स्वरुपात बदल झालेला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका यांनी आपल्याला कळविले. परंतु आरोग्य कार्यालयाने सदर पदधारकाचे आर्थिक नुकसान करण्याच्या हेतूने कामाच्या स्वरुपात बदल झाल्याचे कारण दाखवून निवासी वैद्यकीय अधिकारी भत्ता दि.१.१२.२००४ पासून बेकायदेशीरपणे बंद केला. अर्ज करुन देखील सदर भत्ता पूर्ववत चालू करण्याबाबत पुणे महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही व खोटी उत्तरे देऊन दिशाभुल केली आहे. म्हणून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी अपीलकर्ता डॉ.बेनेडिक्ट मार्टिन फ्रान्सिस यांनी केली.

डॉ.फ्रान्सिस यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेत. या पदाला पूर्वी निवासी भत्ता किती व कोणत्या कालावधीत मिळत होता, याबाबतची कोणतीही कागदपत्रे खात्याकडे उपलब्ध नाहीत. तसेच वेतन आणि भत्ते निश्चित करताना वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यवाही केली जाते. निवासी वैद्यकीय भत्ता सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी डॉ.प्र.शं.धायगुडे यांनी केले.

डॉ.फ्रान्सिस यांनी उपस्थित केलेले मुद्दे माहितीपेक्षा मुख्यत: प्रशासकीय कार्यवाहीविषयक आहेत. दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही. याबाबत स्पष्टीकरणासह संपूर्ण माहिती डॉ.फ्रान्सिस यांना चार दिवसात द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. दरम्यान खातेप्रमुख म्हणून आरोग्यप्रमुखांनी दिलेल्या माहितीवरुनच जन माहिती अधिकारी माहिती देऊ शकतात. तत्कालीन आरोग्यप्रमुख डॉ.प्र.शं.धायगुडे यांनी सुनावणीदरम्यानच्या आदेशाची कल्पना आपल्याला दिली नाही. दि.६.१०.२००८ रोजी काही कारणाने त्यांनी अचानक स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज दिला व दि.१.११.२००८ पासून ते वैद्यकीय रजेवर गेले. दि.६.१.२००९ रोजी त्यांचा राजीनामा मान्य झाला, असे जन माहिती अधिकारी तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका डॉ.अ.वि.चांदककर यांनी दि.२५.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयातील मेडिकल सुपरिंटेंडेंट या पदाला निवासी वैद्यकीय भत्ता देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिलवार अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका यांनी पूरक कागदपत्रांसह आयोगाला त्वरित सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्ते डॉ.बेनेडिक्ट मार्टिन फ्रान्सिस यांना पुरवावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.१०.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दत्तात्रय बाळासो पाटील
कै. पद्म डॉ.वसंतदादा पाटील माध्य.विद्यालय,
कांचनपूर, ता. मिरज, जि. सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
कै. पद्म डॉ.वसंतदादा पाटील माध्य.विद्यालय,
कांचनपूर, ता. मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.४.२००९ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दत्तात्रय बाळासो पाटील
कै. पद्म डॉ.वसंतदादा पाटील माध्य.विद्यालय,
कांचनपूर, ता. मिरज, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली श्री. एन.बी. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
कै. पद्म डॉ.वसंतदादा पाटील माध्य.विद्यालय,
कांचनपूर, ता. मिरज, जि. सांगली श्री. प्रकाश भिमराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेल्या माहितीचे सर्व अभिलेख मुख्याध्यापकांच्या ताब्यात असून आपल्याला ती दिली जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दत्तात्रय बाळासो पाटील यांनी केली.

श्री. पाटील यांनी मागितलेली माहिती व संस्थेच्या अभिलेखात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना दिल्या. श्री. पाटील स्वतः शाळेत लिपीक असून ते मागत असलेले अभिलेख त्यांच्याच ताब्यात आहेत. सर्व अभिलेख पाहण्यासाठी उपलब्ध असून तसे त्यांना कळविले असतानाही संस्थेला त्रास देण्यासाठी ते अशा स्वरुपाचे अर्ज करीत आहेत. एक जाहिरात व नेमणूक आदेश एवढीच माहिती त्यावेळी द्यावयाची राहिली. आपले सेवापुस्तक पूर्ण केलेले नाही. नियमित वेतनवाढी दिलेल्या नाहीत, अशा स्वरुपाच्या त्यांच्या तक्रारी आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. प्रकाश भिमराव पाटील यांनी केले. शाळेशी संबंधित माहिती देण्याचा आदेश आपण अपिलाच्या निर्णयात दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, सांगली श्री. एन.बी. पाटील यांनी केले.

श्री. पाटील यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले आहे. स्वतः च्याच ताब्यात असलेल्या अभिलेखाबाबत त्यांनी मागणी करणे योग्य नाही. सर्व कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीच्या आदेशाच्या प्रती

देणे आवश्यक नाही. त्या व्यतिरिक्त राहिलेली माहिती दोन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २० .११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
रा. तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर,
ता. शिरूर, जि. पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,
शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
रा. तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरूर,
ता. शिरूर, जि. पुणे श्री. उदयसिंह भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे श्री. ऋषिकेष शेळके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.५.२००७ |

## ८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

शिरुर शहरातील निवडणूकीच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती संपूर्णपणे मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले यांनी केली.

श्री. भोसले यांनी केलेला माहितीच्या मागणीचा अर्ज पाहता त्यात माहितीपेक्षा आरोपच अधिक आहेत. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले व अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला. अपीलकर्त्याविरुध्द गुन्हा दाखल केलेला असून त्यामुळे त्रास देण्याच्या उद्देशाने अपीलकर्ता अशा प्रकारचे अर्ज व अपिले करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर , ता. शिरूर  व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर यांनी केले.

'..... यांना तहसीलदाराचे चमचे म्हणून ठेवले आहे काय ?' '.... तहसील कार्यालयातील सक्षम अधिकारी मेले आहेत काय ?' अशा स्वरुपात विचारणा अपीलकर्त्याने केली असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ही 'माहिती' ठरत नाही, तसेच अपीलकर्त्याने वापरलेली भाषाही अधिकृत पत्रव्यवहारातील सुसंस्कृततेची पातळी राखणारी नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०९.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दिलीप दिगंबर नवगिरे
रा. १३/३, एल.आय.जी.निगडी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक (वर्ग-१ ) व
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५,फायनान्स रोड, उत्तरवादी
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत,
१ला मजला, पुणे-४११ ००१

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक,
हवेली क्र.२, पुष्पा हाईट्स, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दिलीप दिगंबर नवगिरे
रा. १३/३, एल.आय.जी.निगडी, पुणे-४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक (वर्ग-१ ) व
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५,फायनान्स रोड,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत,
१ला मजला, पुणे-४११ ००१ श्री. चिंतामण भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक,
हवेली क्र.२, पुष्पा हाईट्स, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३७
श्री. ए.व्ही. चटलावार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.२.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२ यांचे कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्त क्र. १८५३४/९० याचा नवीन दस्त क्र. २५७४/९७ बाबत माहिती

## विवेचन

सन १९९० मध्ये केलेल्या नवीन दस्ताची सन १९९७ मध्ये नोंदणी झाली. त्यामध्ये चुकीचा मंजूर ले-आऊट जोडून शासनाची फसवणूक केली गेली आहे, त्यासंदर्भात काय कारवाई करणार, अशी विचारणा आपण जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२ यांच्याकडे केली होती. परंतु दस्ताची नोंदणी करताना दिलेल्या चुकीच्या कागदपत्रांची तपासणी करुन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर यांनी निर्णय द्यावयास हवा होता, तसा तो दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीप दिगंबर नवगिरे यांनी केली.

कागदपत्रासोबत जोडलेला मंजूर ले आऊट प्लॅन बनावट आहे, हे सिध्द झाल्याशिवाय पुढील कारवाई करता येणार नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२ श्री. ए.व्ही. चटलावार यांनी केले. जन माहिती अधिकारी यांनी संबंधित दस्तऐवजाची स्कॅनिंग प्रत मागवून पडताळणी करून कार्यवाही करावी, असा आदेश आपण अपिलात दिला होता. विषयांकित दस्तऐवजातील घोषणापत्र करुन देणाऱ्यास नोटीस काढून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२ व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर यांचे प्रतिनिधी श्रीमती सी. एस. केदारी यांनी दि.२४.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते.

त्यानुसार झालेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी, अशी मागणी श्री. नवगिरे यांनी केली. ती रास्त आहे. मात्र कागदपत्रे बनावट असून शासनाची फसवणूक केल्याबाबतची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकाऱ्यांचा आदेश व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील नोंदीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२ श्री. ए.व्ही. चटलावार व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर श्री. चिंतामण भुरकुंडे यांनी दि. २०.१०.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. यशवंतराव मन्यासाहेब राजेशिर्के
प्लॉट नं. ६३७/१, श्री स्वामी समर्थ मंदीरानजीक,
आर. के. नगर, कोल्हापूर - ४१६०१३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपविभागिय अधिकारी,
हवेली, ता. हवेली, जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तहसीलदार,
ता. वेल्हे, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०६ / २००९ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.३.२००७ व २८.२.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.३.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.५.२००८ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - श्री. श्रीधर विठ्ठल नातू यांना मौजे कांदवे गाव विकले असल्याचे ज्या कागदपत्रांआधारे नमूद केले आहे त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती, खरेदी खताची नक्कल, तहसीलदार यांच्या अहवालाची प्रत. | |

**विवेचन**

श्री. यशवंतराव मन्यासाहेब राजेशिर्के यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, वेल्हे जि. पुणे यांचेकडे केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अर्जदाराने मौजे कांदवे येथील नंबर व त्यावरील फेरफार संदर्भ

नमूद न केल्यामुळे सदरची महिती ही कोणत्याही आधाराशिवाय देता येत नाही, असे उत्तर जनमहिती अधिकारी तथा तहसीलदार, वेल्हे यांनी दिले आहे. अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास वेगवेगळ्या कार्यालयांकडे अर्ज करावयास लावल्याची अपिलकर्त्याची तक्रार आहे. ती रास्त आहे. तिची दखल घेऊन अशा अर्जांवरील कार्यवाही करण्याची समज जनमहिती अधिकारी तथा तहसीलदार, वेल्हे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्त्यांनी संबंधित जमीन व्यवहाराबाबतचे नेमके नंबर कळवावे व त्यानुसार जनमहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत माहिती द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.२६-१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे-४११ ००१

श्री. बाळकृष्ण बापू कुरळे (पवार)
सागर निवास, राजाराम नगर, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी,
वाळवा विभाग, इस्लामपूर, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.६.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बाळकृष्ण बापू कुरळे (पवार)
सागर निवास, राजाराम नगर, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली श्री. डी.एस.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी,
वाळवा विभाग, इस्लामपूर, जि. सांगली श्री. धनाजी कि. पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

माजी सैनिक तलाठी या पदासाठी दि.२४.६.२००७ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत, तसेच दि. १९.७.२००७ रोजी झालेल्या तोंडी परीक्षेत जास्त गुण मिळूनही आपली नेमणूक केली गेली नाही. तोंडी परीक्षेसाठी असलेल्या आठ परीक्षकांपैकी अतिरिक्त जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी व समाजकल्याण अधिकारी उपस्थित नव्हते. असे असताना सर्व सदस्यांच्या वतीने गुण देण्यात आले आहेत. सदस्यांचे उपस्थिती पत्रक जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर यांनी दिले नाही व बनावट गुणपत्रिका दिली. एकूणच निकाल खोटा आहे, व तोंडी परीक्षेचा निकाल अगोदरच तयार ठेवला होता, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण बापू कुरळे (पवार) यांनी केली.

श्री. कुरळे (पवार) यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्यात आली. निकालाबाबतचे त्यांचे आक्षेप हा माहितीच्या अधिकाराचा भाग होऊ शकत नाही. तोंडी परीक्षेच्या वेळी हजर असलेल्या सर्व प्रतिनिधींच्या एकत्रित सह्या गुणपत्रिकेवर असून नियमानुसार कार्यवाही केली आहे. त्याबाबतचा त्यांचा आक्षेप योग्य नाही. संबंधित उत्तरपत्रिका श्री. कुरळे (पवार) यांना समक्ष दाखविल्या आहेत. मात्र लेखी परीक्षेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार प्रश्नपत्रिका नष्ट केल्या जातात, त्यामुळे त्या देण्यात आलेल्या नाहीत. तसे श्री. कुरळे (पवार) यांना कळविण्यात आले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर श्री. धनाजी पाटील यांनी केले.

या सर्व बाबींची चौकशी होऊन आपली नेमणूक व्हावी, अशी मागणी श्री. कुरळे (पवार) यांनी लेखी व तोंडी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तिची दखल घेता येणार नाही. मात्र शासकीय सेवेतील नियुक्त्यांबाबतची प्रक्रिया पारदर्शक असणे आवश्यक

आहे. या दृष्टीने संबंधित भरतीबाबत चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. जिल्हाधिकारी, सांगली यांनी श्री. बाळकृष्ण बापू कुरळे (पवार) यांच्या निवेदनातील मुद्दयांच्या अनुषंगाने विषयांकित भरतीबाबत चौकशी करुन वस्तुस्थितीची माहिती देणारा अहवाल दि. ५.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

पुणे
दि. ३१.१०.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

# माहितीचा अधिकार नियम, २००५ अन्वये माहिती मागविण्याचा अर्ज

## Application for obtaining information under the Right to Information Act, 2005

Annexure "A"
(See Rule 3)

प्रति,

शासकीय माहिती अधिकारी,

अध्यक्ष, जिल्हा समिती
तथा जिल्हाधिकारी सो.
सांगली

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : श्री कुरवे (पवार) बाळकृष्ण बापू

२) पत्ता : सागर निवास, आर. आय. टी. समोर
मु. पो. राजारामनगर ता. वाळवा
जि. सांगली

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील –

(एक) माहितीचा विषय : माजी सैनिक तरतूदी या पदाच्या मौखिक परिक्षा घेतलेल्या परिक्षकांच्या उपस्थिती पत्रकाच्या छायांकित प्रत मिळणे बाबत

[विषयाचा स्थूल प्रकार दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन मंजुरी/सेवा बाबी/परवाने इ.) Broad category of the subject to be indicated (such as grant of Govt. Land/Service Matters/Licenses, etc.)]

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी : मौखिक परिक्षा दिनांक १९-०७-२००८

[ज्या कालावधी संबंधातील माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शविणे. Relevant period for which information is required to be indicated]

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : मौखिक परिक्षा घेतलेल्या परिक्षकांच्या उपस्थिती पत्रकाच्या छायांकीत प्रत मिळणे बाबत

[माहितीचा विशेष तपशील दर्शविणे आवश्यक Specific details of the information is required to be indicated]

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः आवश्यक आहे किंवा कसे? [प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.] : टपालाद्वारे,

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत [नोंदणीकृत, शीघ्र, Ordinary, Registered or Speed] : शीघ्र

४) अर्जदार हा दारिद्र्यरेषेखालील आहे काय : नाही

(जर असेल तर त्याबाबतच्या पुराव्याची छायाप्रत जोडावी.)

ठिकाण : राजारामनगर
दिनांक : ०८/११/२००८

अर्जदाराची स्वाक्षरी

महाविद्यालय, इस्लामपूर ... 90199101

मुख्याध्यापिका
... पाटील कन्या प्रशाला व ज्युनि. महाविद्यालय, इस्लामपूर.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. गोकुळ विष्णू भोर
मु.भोरवाडी, पो.हिवरे बु.ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार जुन्नर,
ता. जुन्नर, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि .१७.१२.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार जुन्नर,<br>ता. जुन्नर, जि. पुणे श्री. संजय तेली<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. विजय पाटील | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.३.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.१२.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

सन १९६२ मध्ये झालेल्या जमीन वाटपाच्या फेरफारासंबंधातील कागदपत्रे, तत्कालीन तहसीलदार, जुन्नर यांनी दि.१८.६.१९९८ रोजी वाटपपत्र रद्द केल्याबाबत दिलेले आदेश यांच्या प्रती वारंवार मागूनही आपल्याला मिळत नाहीत. तेथील निवृत्त तलाठी श्री. भास्कर शंकर नढे यांनी कार्यालयीन कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन कागदपत्र गहाळ वा नष्ट केली असावीत, तसेच फेरफारात खाडाखोड केली आहे, त्याबाबतचा खुलासाही दिला जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. गोकुळ विष्णू भोर यांनी विविध लेखी निवेदनांद्वारे व राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केले आहे.

श्री. भोर यांनी एकूण तेरा मुद्दयांची माहिती मागितली होती. वडिलार्जित जमिनीच्या वारस नोंदीबाबत त्यांचा विषय आहे. या संदर्भातील सर्व कागदपत्रे त्यांना देण्यात आली असून संचिकाही अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आल्या. तत्कालीन तलाठी श्री. श्री. भास्कर शंकर नढे यांच्या सांगण्यावरुन फेरफेर नोंदीत नव्याने मजकूर लिहून खाडाखोड केलेली आहे, असे त्यांचे म्हणणे असले तरी खाडाखोड दिसून येत नाही. मात्र सदरची नोंद दि.१५.९.१९६३ रोजी फेर नोंदीने रद्द केल्याचा शेरा आहे. तो सुमारे ४५ वर्षांपूर्वीचा असल्यामुळे त्याची सत्यासत्यता पटवून घेणे आता अशक्य आहे. याबाबत श्री. भोर यांनी वेगवेगळ्या स्तरावर केलेले अर्ज नामंजूर झाले आहेत. आवश्यक वाटल्यास त्यांनी दिवाणी न्यायालयात वाटपाचा दावा करावा, असे वेळोवेळी त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे तपशीलवार निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जुन्नर श्री. विजय पाटील यांनी आयोगाला सादर केले.

जन माहिती अधिकाऱ्यांचे निवेदन व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत. त्यांचे अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ०८.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नागया शिवलिंगया स्वामी
रविदर्शन, बी-४०२, पुणे सोलापूर रोड,
हडपसर, पुणे-४११ ०२८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय कृषि सहसंचालक,
पुणे विभाग, पुणे

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
कृषि अधिकारी, सोलापूर, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,
कृषि अधिकारी, सोलापूर यांचे कार्यालय, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७३ + १३१२ + १९११ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |

३. <u>उपस्थित</u>

**अपीलकर्ता -** श्री. नागया शिवलिंगया स्वामी
रविदर्शन, बी-४०२, पुणे सोलापूर रोड,
हडपसर, पुणे-४११ ०२८

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय कृषि सहसंचालक,
पुणे विभाग, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. आर.एन.पाटील

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
कृषि अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, जि. सोलापूर श्री. डी. एल. तांभाळे

३. **अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
कृषि अधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. दिलीप मारुती झेंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,
कृषि अधिकारी, सोलापूर यांचे कार्यालय, जि. सोलापूर श्री. एस.जी. गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री. ए.बी. कदम

**जन माहिती अधिकारी** तथा तंत्र अधिकारी,
कृषि अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, जि. सोलापूर श्री. बी. सी. निराळी

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९७३/ पुणे | ४.१०. २००६ | -- | १८.१०.२००६ | २८.६.२००७ |
| १९११/ पुणे | २१.९.२००७ | २०.१०.२००७ | २८.१.२००८ | ४.२.२००८ |
| १३१२ / पुणे | १४.६.२००७ | २७.९.२००७ | ३.८.२००७ | २८.९.२००७ |

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

**अपील क्र. ९७३/ पुणे**

पर्यवेक्षीय शिथिलतेबाबत आहरण सवितरण अधिका-यांवर नियमाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत शासनाचे आदेश असताना कित्येक वर्षांपासून याबाबतीत निर्णय घेण्यास निश्चित कोणते कार्यालय सक्षम आहे ? ते जबाबदारी का टाळतात ? नियमाप्रमाणे कार्यवाही का होत नाही ? शासन निर्णय, न्यायनिवाडे स्पष्ट असतांना व सक्षम असाल तर कार्यालयास ॲक्शन घेण्यास हाताला कंप का सुटतो? श्री. देशमुख, जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी सोलापूर हे रोहयो घोटाळ्यात कोणत्या कारणासाठी निलंबित झाले व कोणत्या नियमाने ते पुन्हा कामावर आले ? याबाबत माहिती, या प्रकरणाबाबत कार्यालयाचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या काय आहेत, इ. अनुषंगिक माहिती

**अपील क्र. १९११/ पुणे**

दि. ३.११.२००६, दि.८.१२.२००६, दि. १३.२.२००७ ची पत्रे व कृषि आयुक्तालयाचे पत्र दि. ८.११.२००६ च्या पत्रांच्या प्रती

**अपील क्र. १३१२/ पुणे**

विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या देयकाला व्याज देण्याबाबत जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांची नावे कळविण्याबाबतची सद्य परिस्थितीची माहिती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७.६.२००८, दि. १७.६.२००८ व दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.२.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

शासकीय पैशाच्या अपहाराला पर्यवेक्षीय शिथिलतेस जबाबदार असून संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी आपल्याला देत नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नागया शिवलिंगया स्वामी यांनी तीन अपिलांद्वारे राज्य माहिती आयोगाकडे केली आहे.

सेवानिवृत्तीनंतर आपल्याला विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या रकमेवर व्याज मिळावे, अशी आपली मागणी असून मूळ रक्कम देण्यासाठी चार - पाच वर्षे लागली व विलंबाला जबाबदार कोण, या कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची नावे दिली जात नाहीत, असे प्रतिपादन श्री. स्वामी यांनी केले.

श्री. स्वामी कृषि खात्यात सहाय्यक अधीक्षक या पदावर होते. श्री. स्वामी यांना अपहाराच्या कारणावरुन निलंबित करण्यात आले होते. शास्तीही करण्यात आली. कृषि आयुक्त यांनी त्यांचे निलंबन रद्द केले. श्री.स्वामी यांच्या विरुध्द पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारीची चौकशी सुरु आहे. या अनुषंगाने श्री. स्वामी सातत्याने विविध पातळ्यांवर पत्र, अर्ज व अपिले करीत आले आहेत. संबंधित माहिती वेळोवेळी त्यांना देण्यात आली आहे, तसेच सर्व कागदपत्रेही दाखविण्यात आली आहेत. दिलेली माहिती योग्य आहे. चौकशीचा आदेश कायद्यानुसार योग्य प्रकारे दिलेला नाही, आकसाने / सूड बुध्दीने / ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने आपल्यावर केलेल्या कारवाईची चौकशी व्हावी, अशा स्वरुपाचे मुद्दे श्री. स्वामी यांनी मांडले आहेत. ते आक्षेपार्ह आहेत व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती 'माहिती' ठरत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. एस.जी. गायकवाड व अपिलीय प्राधिकारी श्री. आर.एन. पाटील यांनी केले.

नियमाप्रमाणे चौकशी न करणे, सत्य परिस्थिती दडपण्याचा प्रयत्न करणे, मुख्य विषयाला बगल देऊन अनावश्यक चौकशी करणे, पोलिस चौकशीबाबत कायद्यानुसार योग्य प्रक्रियेचे पालन न

करणे, नि:पक्षपातीपणाचा अभाव, शासन निर्णयाबाबत अज्ञान इ. मुद्दे श्री. स्वामी यांनी विपुल पत्रव्यवहारात, निवेदनांमध्ये व अपील अर्जात मांडले आहेत. नियमाप्रमाणे कार्यवाही का होत नाही ? अधिकारी जबाबदारी का टाळतात ? आपण सक्षम असाल तर आपल्या कार्यालयास ॲक्शन घेण्यास हाताला कंप का सुटतो ? नियंत्रण अधिकारी यांची काही जबाबदारी नाही का, का नियंत्रणच नाही? आकसबुध्दी जागृत झाली का? अशा स्वरूपाचे प्रश्न श्री. स्वामी यांनी 'माहिती' म्हणून विचारले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशा प्रकारची विचारणा माहितीच्या व्याख्येत येत नाही. तसेच त्यांनी वापरलेली भाषाही अधिकृत पत्रव्यवहारातील अपेक्षित पातळी राखणारी नाही. तथापि संबंधित सर्व संचिकेचे अवलोकन त्यांना करु द्यावे व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १६.१०.२००९**